Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

January-2020

SPECIAL ISSUE-CCI

## भारताच्या जडणघडणीत विचारवंताचे योगदान



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Anil D. Warghat
Associate Professor
Govt.College
of Education
Buldana Dist-Buldana

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार — प्रा.झरेकर आर.एस. | 1 |
| 2 | महिला सक्षमीकरण : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान — प्रा.डॉ. वामन ए. खोब्रागडे | 5 |
| 3 | आचार्य विनोबा भावे यांचे भूदान ते ग्रामदान या चळवळी विषयीचे मत — प्रा.विलास मेश्राम | 10 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांची वर्तमान उपयुक्तता — विक्की अशोक रामटेके | 15 |
| 5 | महात्मा गांधीं आणि स्त्रीसक्षमीकरण — डॉ.वर्षा गंगणे | 20 |
| 6 | शेडयुल्ड कास्ट फेडरेशन — प्रा. मंगेश वाहाणे | 27 |
| 7 | महात्मा फुले यांचा राजकीय विचार: एक ऐतिहासिक अभ्यास — प्रा डॉ नितीन उल्हासराव सराफ | 33 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी, उद्योगविषयक विचार — प्रा. वसुंधरा दत्ताराम साळुंखे | 38 |
| 9 | भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषीचे स्थान — सहा.प्रा.एम.बी.रेवतकर | 42 |
| 10 | अष्टपैलू व्यक्तिमत्त्व : सावित्रीबाई फुले — प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 47 |
| 11 | संत गाडगेबाबांचा शैक्षणिक दृष्टिकोन — डॉ.प्रवीण घारपुरे | 53 |
| 12 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचा ग्रामगीतेतील ग्रामिण विकासातील सहभाग व कार्य — प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 57 |
| 13 | महात्मा गांधी के आर्थिक विचार — प्रा. डॉ.ए.बी.पटले | 61 |
| 14 | स्वामी विवेकानंदांचे धार्मिक विचार: एक दृष्टीक्षेप — डॉ.उज्ज्वला पाटील | 65 |
| 15 | शाहूमहाराजांचे कृषी क्षेत्रातील योगदान — प्रा.डॉ.सतिश हरलाल पारधी | 70 |
| 16 | भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री सक्षमीकरण विषयक विचाराचे व कार्याचे योगदान — प्रा.डॉ.प्रशांत वामनराव खेडकर | 73 |
| 17 | स्वामी विवेकानंदांचे धार्मिक विचार — डॉ.मीना काळेले | 77 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोडबिल — प्रा.डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ | 80 |
| 20 | राष्ट्रसंतांची 'आदर्शग्राम' संकल्पना — प्रा. डॉ. सिद्राम किशनराव मुंडे | 84 |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार — प्रा. मनोहर आनंदराव गुडधे | 92 |




Scanned with OKEN Scanner

# आचार्य विनोबा भावे यांचे भूदान ते ग्रामदान या चळवळी विषयीचे मत

प्रा.विलास मेश्राम
सहाय्यक प्राध्यापक डॉ. एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस्, अॅन्ड कॉमर्स,
पवनी, ता.पवनी,जि.भंडारा

विनोबा भावे यांचे पूर्ण नाव विनायक नरहर भावे. ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा कुलबा जिल्हयातील गागोदे गावी जन्म झाला. वडिल तिक्ष्ण बुध्दीचे व महत्वकांक्षी होते. विनोबांचे लहाणपण खेडयात गेले. तिथल्या निसर्गाइतंकेच मोलाचे संस्कार त्यांच्या मातोश्रींनी त्यांच्या बालमणावर केले.

अध्ययनाचा श्रीगणेयशा पुणे शहरी झाल्यानंतर १९०५ साली ते बडोदयास गेले. लहानपणापासूनच तिक्ष्ण बुध्दी व असामान्य स्मरणशक्ती यांचे वरदान विनोबांना लाभलेले होते. अध्ययन शिलतेची त्यात भर पडली त्यामुळे त्यांचे शैक्षणिक जीवन यशोमय ठरले. मराठी, संस्कृत, फ्रेंच आदी भाषेबरोबरच गणिताची त्यांना खुप आवड होती. १९१४ साली शालान्त परीक्षा पास झाल्यावर महाविद्यालयात त्यांनी प्रवेश केला.

पण पुढे त्यांचे मन शिक्षणात रमेना. राष्ट्रीय चळवळीचे त्यांना आकर्षित केले. बंगालच्या क्रांतीकारकांच्या कार्याने त्यांना प्रेरीत केले. एकीकडे अध्यात्माची ओढ दुसरीकडे स्वातंत्र्यसग्रामाची ओढयात त्यांनी अभ्यास सोडून दिला आणि घर सोडण्याचा निर्णय घेतला. काशीला जावून त्यांनी संस्कृतचे व धर्मग्रंथाचे सखोल अध्ययन केले. राजकीय पुढाऱ्यांशी त्यांनी संपर्क ठेवला परंतु त्यांनी आपल्या समोर नि:स्वार्थ व समर्पित राजकीय नेत्याचा जो आदर्श उभा केला होता त्यांच्याशी बरोबरी करणारा कोणीच त्यांना दिसेना.

१९१६ साली हिंदू विश्वविद्यालयाच्या समारंभा निमीत्य महात्मा गांधीचे काशी येथे भाषण झाले. विनोबांना त्या भाषणातील काही मुद्यांनी आकर्षित केले. ते गांधींच्या कोचरब येथील आश्रमात दाखल झाले. आश्रमातील सरळ पवित्र जीवनक्रम आणि वागण्यात अमेदभाव देशभक्ती आणि त्याग तपस्व्यासारखे जीवन पाहून विनोबांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. जे उद्‌देश मनात धरून त्यांनी घर सोडले होते ते क्रांती आणि अध्यात्म हे दोन्हीही गांधीजींच्या जीवनात त्यांना एकत्र लाभले. आश्रमाच्या जीवनाशी ते समरस झाले. शरीर श्रमाच्या प्रत्येक गाष्टीत सहभागी झाले.

तिथुनच विनोबा भावे नलगुंडा जिल्हयातल्या पोचमपल्ली गावी पोहचले. पुढे दंडकारण्य सुरू होणार होते. साम्यवादाचा या भागात खुप जोर होता. रक्तपानाला सुमारच नव्हता. वस्ती तीन हजाराची, पैकी दोन हजार भूमिहीन हरिजनांची स्थिती अगदीच सोचनिय होती. हरिजनांनी विनोबांना जमीन मिळवूण देण्याची विनंती केली. ऐंशी एकर जमीन ते मागत होते. गावकऱ्यांच्या सभेत विनोबांनी आवाहन केले. रामचंद्र रेड्डी नावाचे गृहस्थ शंभर एकर जमीन द्यायला तयार झाले.

विनोबांनी विचार केला 'अशा तऱ्हेने पायी यात्रा करीत जमीन मिळवित गेलो तर जमीनीचा प्रश्न सुटेल, अशी कल्पना त्यांच्या मनात उदय पावली.' या जमिनी मिळविण्याच्या कार्याला त्यांनी 'भूदान यज्ञ' असे नाव दिले. याप्रमाणे भूदान यज्ञाच्या गंगोत्रीचा उगम झाला. हिंसेने पीडलेल्या, रक्ताने न्हालेल्या तेलंगणातल्या घरोघरी फिरून भूदान यज्ञाचा संदेश सांगण्याचा त्यांनी संकल्प केला. दोन महिन्यानंतर बारा हजार एकर जमीन त्यांना मिळाली.



Scanned with OKEN Scanner